मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय

# पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-१,मिरारोड

कार्यालयाचा पत्ता- लक्ष्मी पार्क, कनकीया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे-४०११०७
dcp.zone1.mb-vv@mahapolice.gov.in ☎ 022-28100090

OW.No.DCP-ZN-1/RDR/CRPC-144/ Tourism prohib.Order/2022-3687 Date.- 14/07/2022

वाचले :- १. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२)
२. प्रभारी अधिकारी, भाईंदर व उत्तन सागरी पोलीस ठाणे यांचेकडील दि. १४/०७/२०२२ चे अहवाल.

--oo--

**पर्यटन स्थळांबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये मनाई आदेश :-**

**ज्याअर्थी**, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ मिरारोड कार्यक्षेत्रात मान्सुन कालावधीत मोठ्या संख्येने पर्यटक हे निसर्गाचा तसेच धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी आनंद घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे सदर ठिकाणी पर्यटकांची जिवीत व वित्त हानी होवु नये किंवा पर्यटकांचे जिवन धोक्यात येवु नये याकरीता प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे गरजेचे झाले आहे.

**ज्याअर्थी**, संदर्भ क्रमांक ०२ अन्वये वर नमुद पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी असे निदर्शनास आणुन दिले आहे की, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ०१ मिरारोड कार्यक्षेत्रातील अभयारण्यात/जंगलात मान्सुन कालावधीत मोठ्या प्रमाणात धबधबे वाहत असुन सदर धबधब्याकडे जाण्या-येण्याच्या वाटा अरुंद आहेत. मान्सुन कालावधीत निसर्गाचा तसेच पावसाचा/धबधब्याचा, समुद्र किनारी आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक पालघर,ठाणे, रायगड, मुंबई इत्यादी ठिकाणांहुन येवून गर्दी करत असतात. त्यामुळे सदर ठिकाणी पर्यटकांची जिवीत व वित्त हानी होवु नये किंवा पर्यटकांचे जिवन धोक्यात येवु नये याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनाई आदेश निर्गमित करण्याबाबत या कार्यालयास विंनती केली आहे.

**त्याअर्थी** मी, अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -०१ मिरारोड मला प्रदान करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या क्रमांक- PRO-0920/C.R.217/Spl.-2, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (सन १९७४ चा २) च्या कलम २१ नुसार प्राप्त विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील **परिमंडळ १**

मिरारोड कार्यक्षेत्रातील भाईंदर व उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीतील सर्व धबधबे, तलाव, धरणे व इतर पर्यटनस्थळांचे १ कि.मी. परिसरात व समुद्रकिनारी दिनांक १५/०७/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक १३/०८/२०२२ रोजीचे २३.५९ वाजे पावेतो खालील बाबींकरीता प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून आदेश लागु करीत आहे.

१. पावसामुळे वेगाने वाहनाऱ्या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे अथवा त्यामध्ये पोहणे.

२. धबधब्याच्या उगमस्थानी जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे.

३. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी मोबाईद्वारे सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे.

४. पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्यांचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतुक करणे, अनधिकृत मध्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे.

५. सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.

६. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतुकीस परिणाम होईल अशा प्रकारे वाहन चालविणे.

७. वाहनांची ने-आण करताना बेदकारपणे वाहन चालवुन इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे.

८. सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्य उघड्यावर इतरत्र फेकणे.

९. सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांसोबत असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा त्यांचे मनास लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.

१०. सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डी.जे.सिस्टीम वाजविणे, गाडीमधील स्पीकर वाजवणे व त्यामुळे ध्वनी प्रदुषण करणे.

११. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदुषण होईल अशी कोणतीही कृती करणे.

जो कोणी सदर आदेशाचा भंग करेल तो इसम भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक जागी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ०१ मिरारोड

कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाच्या प्रती स्थानिक वृत्त पत्रातुन प्रसिध्द करावा. आदेशामुळे प्रभावित होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आदेशापुर्वी नोटीस बजावणे शक्य नसल्याने सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक १५/०७/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक १३/०८/२०२२ रोजीचे २३.५९ वाजे पावेतो लागु राहील.

सदरचा आदेश आज दिनांक १४/०७/२०२२ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला असे.

ठिकाण- मिरारोड

शिक्का-

( अमित काळे ) 15/7/22

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड,**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय.
४. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर.

**माहिती व कार्यवाहीस्तव-**

१. उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे, वसई
२. कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे, भाईंदर, वसई
३. सहाय्यक पोलीस आयुक्त मिरारोड, नवघर, भाईंदर विभाग.
४. **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन सागरी पोलीस ठाणे.**
५. जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे व पालघर यांना वृत्तपत्रात बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी रवाना.
६. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांचेकडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
७. नस्तीकरीता.